Government of Maharashtra

MAGNETIC MAHARASHTRA

CONVERGENCE 2018

Global Investors Summit - Feb 18-20

# वस्तू व सेवा कर प्रणालीत मुल्यवर्धित करावर आधारित उद्योगांना देण्यात येणाऱ्या औद्योगिक विकास अनुदान संरचनेत सुधारणा करण्याबाबत

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**उद्योग विभाग**

Government of Maharashtra

# वस्तू व सेवा कर प्रणालीत मुल्यवर्धित करावर आधारित उद्योगांना देण्यात येणाऱ्या औद्योगिक विकास अनुदान संरचनेत सुधारणा करण्याबाबत – 2018

## 1. प्रस्तावना:

राज्यातील मुंबई, पुणे व ठाणे या औद्योगिक पट्ट्यातील उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्याकरीता व राज्यातील औद्योगिकदृष्ट्या विकसनशील व मागास भागात उद्योग आकर्षिक होण्याकरीता तसेच त्यामधून रोजगार निर्माण व्हावा याकरीता राज्य शासनामार्फत सन 1964 पासून राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येत आहे.

राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजना, 2007 दिनांक 1/4/2007 ते 31/3/2013 या कालावधीत राबविण्यात आली आहे. शासनाने दिनांक 22/2/2013 रोजी नवीन औद्योगिक धोरण–2013 जाहिर केले आहे. त्यानुसार सामूहिक प्रोत्साहन योजना, 2007 चा कालावधी संपुष्टात आणून दिनांक 1/4/2013 पासून राज्यात सामूहिक प्रोत्साहन योजना, 2013 लागू करण्यात आली आहे. सदर योजनेचा कालावधी दिनांक 31/3/2018 पर्यंत आहे.

देशात दि.1/7/2017 पासून वस्तू व सेवा कर प्रणाली लागू करण्यात आली असून, राज्यांतर्गत विविध करांची पुनर्रचना होऊन त्यांचे एकाच करात रुपांतर झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने उद्योगांकरिता सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत मूल्यवर्धित कर (व्हॅट), केंद्रीय विक्रीकर (सीएसटी), मुद्रांक शुल्क, वीज शुल्क इत्यादी प्रोत्साहने देण्यात येतात. त्यामुळे सद्यस्थितीत केंद्रीय विक्री कर व मुल्यवर्धित कर, हे वस्तू व सेवा करामध्ये समाविष्ट झाले असल्याने मूल्यवर्धित करावर आधारित औद्योगिक विकास अनुदानाचे सूत्रामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वस्तू व सेवा कर प्रणालीवर आधारित औद्योगिक विकास अनुदानाच्या सूत्रात बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय :

वस्तू व सेवा कर प्रणालीवर आधारित उद्योगांसाठी सामुहिक प्रोत्साहन योजनेतील प्रचलित विविध प्रोत्साहने कायम ठेवून केवळ मुल्यवर्धित करावर आधारित औद्योगिक विकास अनुदानात बदल करुन सुधारित सूत्र राज्य वस्तू व सेवा करावर आधारित सुधारणा करण्यात येत आहे.

## 1. विशाल, अतिविशाल प्रवर्गातील घटकांना द्यावयाचे औद्योगिक विकास अनुदान –

A. सामुहिक प्रोत्साहन योजना 2001, 2007 व 2013 अंतर्गत ज्यांना देकार पत्र दिलेले आहेत व सामुहिक प्रोत्साहन योजना 2013 मध्ये यापुढे योजना कालावधीत द्यावयाचे देकार पत्रांना – अशा घटकांना द्यावयाची प्रोत्साहने.

- 100% अथवा 50% ढोबळ मुल्यवर्धित करावर आधारित घटकांकरिता सूत्र
  (राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, तालुका वर्गीकरणानुसार विहित, 100% अथवा 50% ढोबळ (Gross) राज्य वस्तू व सेवा कर)
- 100% निव्वळ मुल्यवर्धित करावर आधारित देकार पत्र दिलेल्या घटकाकरिता सूत्र
  (राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, 100% निव्वळ (Net) राज्य वस्तू व सेवा कर )

B. वरील दोन्ही परिस्थितीतील घटकांसाठी खालील अटींच्या अधीन प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

- सदर घटकांना वार्षिक देय एकत्रित प्रोत्साहनांची रक्कम = एकूण प्रोत्साहने भागीले एकूण अनुदान उपभोगण्याचा कालावधीच्या सरासरी एवढया मर्यादेत राहील.
- संबंधीत वर्षातील सरासरी पेक्षा अतिरिक्त प्रोत्साहनांची रक्कम नंतरच्या लगतच्या वर्षी अनुज्ञेय राहील.
- वाहन निर्मिती क्षेत्राकरीता राज्यात उत्पादित व परिवहन विभागाकडे नोंदणी झालेल्या वाहनांवरील राज्य वस्तु व सेवा करावर आधारीत औद्योगक विकास अनुदान अनुज्ञेय राहील.

## 2. मोठया प्रकल्पांसाठी चालू व नवीन द्यावयाची औद्योगिक विकास अनुदान –

(राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, 60% ते 100%, तालुका वर्गीकरणानुसार, निव्वळ (Net) राज्य वस्तू व सेवा कर)

## 3. लघु, लहान, मध्यम घटकांना द्यावयाचे औद्योगिक विकास अनुदान–

सदर प्रकल्पांना औद्योगिक विकास अनुदान खालील सूत्रांनुसार प्रस्तावित करण्यात येत आहेत
(राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, 100% ढोबळ (Gross) राज्य वस्तू व सेवा कर)

## 4. कर माफी अथवा विलंबित कर दायित्त्व वर आधारित घटकांना द्यावयाचे औद्योगिक विकास अनुदान (Exemption/Deferred Tax liable Units) -

अशा घटकांना कर माफी अथवा विलंबित कर दायित्त्व स्वरुपात देय प्रोत्साहने औद्योगिक विकास अनुदान स्वरुपात रुपांतरित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर वार्षिक औद्योगिक विकास अनुदानाचे सूत्र खालीलप्रमाणे राहील –

A. कर माफी वर आधारित उद्योग घटकांना औद्योगिक विकास अनुदान खाली सूत्राप्रमाणे राहील.
राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, 100% ढोबळ (Gross) राज्य वस्तू व सेवा कर

B. विलंबित कर दायित्त्व वर आधारित उद्योग घटकांना औद्योगिक विकास अनुदान कर्ज स्वरुपात रुपांतरित करुन घटकास औद्योगिक विकास अनुदान खाली सूत्राप्रमाणे राहील.
राज्यातंर्गत प्रथम विक्रीच्या, 100% ढोबळ (Gross) राज्य वस्तू व सेवा कर सदर कर्जाची परतफेड विलंबित कर दायित्त्व योजनेतील अटी व शर्तीप्रमाणे कायम राहील.

## 5. सदर सुधारणा दि. 01/07/2017 पासून लागू राहील.

वरील आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक 15/कराधन-1 दि. 23/8/17, दि. 18/9/17 व दि. 4/2/18 च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

Government of Maharashtra

## DEPARTMENT OF INDUSTRIES, ENERGY AND LABOR

Government of Maharashtra,
Mantralaya, Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22025393
**Website: https://www.maharashtra.gov.in/**

## DIRECTORATE OF INDUSTRIES

Government of Maharashtra,
New Administrative Building,
2nd floor, Opp. Mantralaya,
Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22023584/22028616
**Website: https://di.maharashtra.gov.in/**

## MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION (MIDC)

Udyog Sarathi, Mahakali Caves Road,
Andheri East, Mumbai, Maharashtra 400093
Tel.: (91-22) 26870800
**Website: https://www.midcindia.org/**

## MAHARASHTRA INDUSTRY, TRADE AND INVESTMENT FACILITATION CELL (MAITRI)

"Krupanidhi" Building, 9,
Walchand Hirachand Marg,
Ballard Estate, Mumbai – 400001
Tel.: (91-22) 22622362
**Email id: maitri-mh@gov.in**
**Website: https://maitri.mahaonline.gov.in/**